# मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई

दिनांक :— ३१ / ०१ / २०२६

## निविदा सुचना

मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई या कार्यालयाच्या वार्षिक मागणीपत्रानुसार देय असणारी संपूर्ण लेखनसामग्री शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई येथुन चढ—उतारासहीत खाजगी वाहनाव्दारे आणण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेमध्ये चढ—उताराचा खर्च नमुद करण्यात यावा. त्यासाठी संबंधित दरकरारदारांनांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे संबंधित दरकरारदारांनी आपल्या निविदा बंद लिफाफॅमध्ये घालून त्यावर **"लेखनसामग्री आणण्याकरिता निविदा"** असे स्पष्ट लिहावे.

तसेच इच्छुक दरकरारदारांना असे सूचित करण्यात येते की, निविदा सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष मुद्रणालयास भेट देवून लेखनसामग्रीची पाहणी करावी आणि निविदा सादर करावी. त्यांनतर कोणत्याही प्रकाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

तरी दरकरारदारांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या मोहरबंद निविदा मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालयात ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून दिनांक ०५.०२.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात.

उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची संबंधित दरकरारदारांनी नोंद घ्यावी.

31.1.26

मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.